# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.10.2025** **वारःबुधवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत भारत समुद्री सप्ताहामध्ये जगभरातील प्रतिनिधींच्या परिषदेला संबोधित करणार
2. रबी हंगामासाठी खतांवर 37 हजार कोटी अनुदान देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
3. विकसित महाराष्ट्र 2047 च्या धोरण दस्तऐवजाला महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाची मान्यता
4. महाराष्ट्र राज्यातील अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना आणखी 11 हजार कोटी रुपयांचं येत्या 15 दिवसात वितरण
5. आशियाई युवा क्रीडा स्पर्धामध्ये पदकतालिकेत भारत नवव्या स्थानावर आणि
6. मोंथा चक्रीवादळामुळे आंध्र प्रदेशात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<u>पंतप्रधान-मेरीटाईम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. सागरी क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातील प्रतिनिधींच्या परिषदेला ते संबोधित करणार आहेत. भारत समुद्री सप्ताह 2025 या सागरी परिषदेमध्ये होणाऱ्या जागतिक सागरी मुख्य कार्यकारी अधिकारी मंचाचं अध्यक्षपदही ते भूषवतील. या परिषदेतील पंतप्रधानांच्या सहभागामुळे सागरी अमृत काल व्हिजन 2047 शी सुसंगत, महत्त्वकांक्षी आणि भविष्यकालीन सागरी परिवर्तनासाठी असलेली वचनबद्धता अधोरेखित होते. परिषदेत 85हून अधिक देशांतील एक लाखाहून अधिक प्रतिनिधी  सहभागी होणार असून, साडेतीनशेहून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी होणार आहेत.

**<u>केंद्रीय मंत्रीमंडळ निर्णय</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत रबी हंगामासाठी खतांवर 37 हजार 952 कोटी रुपयांच्या अनुदानाला मंजुरी देण्यात आली. अनुदानित दर 1 ऑक्टोबरपासून लागू होतील, त्यामुळे शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरांत खतं उपलब्ध होतील असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. आंतरराष्ट्रीय पातळीवरील खतांचे दर लक्षात घेऊन नवीन दर निश्चिती केल्याचं वैष्णव म्हणाले. शेतकऱ्यांना रबी हंगाम 2025-26 साठी मंजूर दरांवर आधारित डाय अमोनियन फॉस्फेट, नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश, सल्फर एनपीकेएस श्रेणीसह खतं सहज उपलब्ध होणार आहेत.

**<u>आठवा वेतन</u>**

आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींनाही काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली असून, अठरा महिन्यांच्या आत आयोग शिफारशी करेल. याचा लाभ 50 लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना होणार आहे. विविध मंत्रालयं, राज्य सरकारे यांच्याशी चर्चा केल्यानंतर या संदर्भ अटी निश्चित केल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>विकसित महाराष्ट्र व्हिजन</u>**

मुंबईत काल झालेल्या महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, विकसित महाराष्ट्र 2047 च्या धोरण दस्तऐवजाला मान्यता देण्यात आली. त्याच्या अंमलबजावणीसाठी विकसित महाराष्ट्र धोरण दस्तऐवज कार्यकारी समिती स्थापन करण्यासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या अंतर्गत 16 क्षेत्रीय गट स्थापन करण्यात

येणार असून प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, आणि सुशासन या चार प्रकारांत 100 उपक्रम राबवले जाणार आहेत. याशिवाय मंत्रिमंडळाच्या बैठकीत अन्य काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नव्या ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी अतिरिक्त साडे सोळाशे कोटी रूपयांच्या निधीसह सुधारित अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पामुळे तुळजापूर शहर शक्तीपीठ रेल्वेमार्गाशी जोडले जाणार आहे.

**<u>अतिवृष्टी भरपाई</u>**

महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय काल मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अतिरिक्त 11 हजार कोटी रुपयांचं वितरण करण्यास विशेष बाब म्हणून बैठकीत मंजुरी देण्यात आली. राज्यात निधीची कमतरता नसून, पुढील पंधरा दिवसांत ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात आल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, ते म्हणाले....

**आतापर्यंत या अंतर्गत आठ हजार कोटी रुपये रिलीज झालेले आहेत. जवळपास चाळीस लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये पैसे पोहोचलेले आहेत. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत अजून अकरा हजार कोटी रुपये रिलीज करण्याला मान्यता देण्यात आली, कारण हे बजेट मधले पैसे नसल्यामुळे याला विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली. आता हेही पैसे पुढच्या पंधरा दिवसांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यापर्यंत पोहोचवण्याचे आदेश आम्ही दिलेले आहेत. एक सुदैवाने ॲग्री टॅक्सचा डेटा असल्यामुळे ॲग्री टॅक्स चे जे अकाउंट होल्डर आहेत. या कोणाचेही आम्ही ई केवायसी करत नाहीये अन्यथा ई केवायसी लाच एक महिना लागला असता फक्त एखाद्या केसमध्ये जिथे ॲग्री स्टॅक मध्ये नाव नाही आणि एलिजिबिलिटी आहे त्यांचंच केवळ ई केवायसी आपण करतोय त्यांनाही आपण पहिले मदत देऊ त्याच्यानंतर मग ई केवायसी करू असाही निर्णय आपण केलेला आहे.**

राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी 32 हजार कोटी रुपयाचं पॅकेज जाहीर करण्यात आलं आहे. त्यातील 8 हजार कोटी रुपये वितरीत करण्यात आले असून त्याचा लाभ 40 लाख शेतकऱ्यांना झाला आहे, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**<u>राष्ट्रपती-उड्डाण</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज हरियाणातील अंबालामधून राफेल या लढाऊ विमानातून उड्डाण करणार आहेत. आसाममधील तेजपूर हवाई दलाच्या तळावरून एप्रिल 2023 मध्ये सुखोई 30 एमकेआय या लढाऊ विमानातूनही त्यांनी याआधी उड्डाण केलं होतं.

**<u>मांडवीय-व्याख्यान</u>**

केंद्रीय कामगार, रोजगार, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय आज संध्याकाळी नवी दिल्लीत सरदार पटेल स्मृती व्याख्यान देणार आहेत. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. भारताचे पहिले माहिती आणि प्रसारण मंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सन्मानार्थ, आकाशवाणीतर्फे दर वर्षी सरदार पटेल स्मृती व्याख्यानाचं आयोजन करण्यात येतं. 31 ऑक्टोबर रोजी सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त आकाशवाणीच्या सर्व वाहिन्यांवरून हे व्याख्यान प्रसारित केलं जाईल.

**<u>छठ</u>**

छठ पूजा उत्सवाची काल श्रद्धा, भक्ती आणि आनंदाच्या वातावरणात सांगता झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छठ पूजेत सहभागी झालेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. छठपूजा हा केवळ धार्मिक विधी नसून आपल्या आस्था, संस्कृती आणि परंपरेचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. जुहू इथं झालेल्या छठपूजेच्या कार्यक्रमात ते काल बोलत होते.

**इस्राइल-गाझा**

इस्रायलच्या संरक्षण दलांनी काल गाझा मध्ये हवाई हल्ले केले.यात नऊ जणांचा मृत्यू झाला. अमेरिकेच्या मध्यस्थीनं केलेल्या युद्धबंदीचं गाझानं प्रथम उल्लंघन केल्याचा इस्राइलचा आरोप आहे, तर हमासनं इस्रायली सैन्यावर हल्ला केल्याचा दावा फेटाळत इस्रायलवर युद्धबंदीचा भंग केल्याचा आरोप केला आहे.

**आशियाई क्रीडा**

बहरीनमधील मनामा इथं सुरू असलेल्या तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धामध्ये काल सहा भारतीय मुष्टियुद्धपटूंनी आपापल्या स्पर्धांच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पुरुषांच्या उपांत्य फेरीत भारताच्या अनंत देशमुखनंही काल कास्यपदक पटकावलं. मुलींच्या उपांत्य फेरीत, 46 किलो गटात खुशी चंदनं मंगोलियावर 5-0 असा विजय मिळवला तर 66 किलो गटात हरनूर कौरने चिनी तैपेईचा 5-0 असा पराभव केला. दुसऱ्या सत्रात, 50 किलो गटात अहानानं उझबेकिस्तानचा 3-2 असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. मुलांच्या गटात, 50 किलो गटात लांचेनबा सिंग मोईबुंग खोंग बाम नं कोरियावर 5-0 असा विजय मिळवत अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. दरम्यान, या स्पर्धामध्ये भारताने आतापर्यंत सर्व खेळांमध्ये 27 पदके जिंकली आहेत, ज्यात चार सुवर्ण, दहा रौप्य आणि तेरा कास्यपदके असुन पदकतालिकेत भारत नवव्या स्थानावर आहे.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील 5 सामन्यांच्या क्रिकेट मालिकेतील पहिला टी-ट्वेंटी सामना आज कॅनबेरामधल्या मनुका ओव्हल इथं खेळला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना दुपारी पावणे दोन वाजता सुरू होईल.

**महिला क्रिकेट**

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत, आज गुवाहाटीत इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात पहिला उपांत्य फेरीचा सामना होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी 3 वाजता सुरू होईल.

**चक्रीवादळ**

मोंथा चक्रीवादळानं काल रात्री आंध्र प्रदेशच्या मछलीपट्टनम आणि कलिंगपट्टनम किनाऱ्यावर ताशी 90 ते 100 किलोमीटर वेगानं धडक दिली. या वादळामुळे आंध्र प्रदेशात जोरदार पाऊस पडला असून राज्यातील 43 हजार हेक्टर पिकांचं नुकसान झालं आहे. हवामान विभागानं आंध्र प्रदेश आणि यानम मध्ये बहुतेक ठिकाणी आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. ओडिशातही काही भागात भूस्खलन आणि झाडे उन्मळून पडल्याचं वृत्त आहे. वादळाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय आपत्ती निवारण दलानं 26 पथकं तैनात केली आहेत. या अनुषंगानं महाराष्ट्रात पाच नोव्हेंबरपर्यंत राज्यभर ढगाळ वातावरण राहण्याची तसंच हलका ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार...